जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/४८२७/२०२२

वाहतुक नियंत्रण अधिसुचना दिनांक - ०५/१२/२०२२

दिनांक ६/१२/२०२२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी येथील पुतळ्यास अभिवादन करणेसाठी मोठ्या प्रमाणात भाविक/अनुयायी येत असतात त्यामुळे सदर चौकात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते सदर गर्दीमुळे वाहतूक कोंडी होवू नये व वाहतुक सुरळीत राहण्याकरीता सदर पिंपरी चौकात येणारी वाहणे अन्य वाहतुक मार्गांनी वळविण्याची आवश्यकता आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सतिष माने, सहायक पोलीस आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड, अति.कार्यभार पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

## पिंपरी वाहतुक विभाग अंतर्गत

१) महाविर चौक चिंचवड कडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे सर्विस रोडने येणारी वाहतुक बंद करुन ती डी मार्ट इन ग्रेड सेपरेटर मधुन इच्छित स्थळी जातील.

२) नाशिक फाटयाकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी कडे सर्विस रोडने येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असुन सदर वाहने डेअरी फार्म ग्रेड सेपरेटर इन व एच.पी.पंप खराळवाडी ग्रेड सेपरेटर इन मध्ये प्रवेश करुन इच्छित स्थळी जातील

३) स्व.इंदिरागांधी पूल ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरीकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असुन सदर वाहने स्व. इंदिरागांधी पुलावरुन मोरवाडी चौकाकडे जावुन इच्छित स्थळी जातील

४) नेहरुनगर चौकाकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी कडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत असुन सदर वाहने एच.ए. कॉर्नर बस स्टॉप येथून मासुळकर कॉलनी व तेथुन इच्छित स्थळी जातील.

तरी पिंपरी चौकाकडे येणारी वाहतुक दि. ६/१२/२०२२ रोजी दुपारनंतर आवश्यकतेनुसार वळविणेबाबत अधिसुचना (नोटीफिकेशन ) काढण्यात येत आहे.

(सतिश माने)
सहाय्यक पोलीस आयुक्त,वाहतूक पिंपरी चिंचवड
पोलीस उप आयुक्त वाहतूक (अति.कार्य.)

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी पिंपरी वाहतुक विभाग

Scanned with CamScanner